जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१८/ 7423
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 06/०९/ २०१८

प्रति,

संस्थाचालक / प्राचार्य (सर्व),
शासनमान्य संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-SSD-CTC) सप्टेंबर २०१८ बॅच बदलाबाबत...**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत विषयांकीत परीक्षा **दि. ११ सप्टेंबर २०१८ रोजी** घेण्यात येत आहे.

सदर परीक्षेसाठी खाली नमूद केलेल्या कारणास्तव बॅच बदल देण्यात येईल इतर कोणत्याही कारणाने बॅच बदल दिला जाणार नाही. याची सर्व संस्थाचालक / प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

बॅच बदल केवळ पुढील बाबतीच मान्य केला जाईल याबाबत अंतिम अधिकार परीक्षा परिषदेस असतील.

१. विद्यापीठ परीक्षा
२. स्पर्धा परीक्षा
३. परीक्षा केंद्रावरील तांत्रिक कारण
४. आकस्मित दुर्घटना

याबाबतची मागणी ई-मेलद्वारे आवश्यक पुराव्यासह करता येईल. बदल मान्य झाल्यास संबंधित परीक्षा केंद्रसंचालक/केंद्रसमन्वयक आणि संबंधित उमेदवारांना ई-मेलद्वारे कळविले जाईल. ज्या ई-मेल द्वारे बॅच बदलाचा प्रस्ताव परिषदेस प्राप्त होईल. त्याच ई-मेल आयडीवर बॅच बदल मान्य / अमान्य बाबत कळविले जाईल.

**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१**

जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१८/7424
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 06/०९/ २०१८

प्रति,

संस्थाचालक / प्राचार्य (सर्व),
शासनमान्य संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-SSD-CTC) सप्टेंबर २०१८ परीक्षा केंद्रावरील Keyboard आणि Mouse बाबत...**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, दि ११ सप्टेंबर २०१८ रोजी होणाऱ्या GCC-SSD-CTC परीक्षेसाठी ज्या संस्थांनी परीक्षार्थी प्रविष्ठ केले आहेत, त्या संस्थांना परीक्षा केंद्रावर स्वत:चे **Keyboard आणि Mouse** वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, याबाबत संस्थांनी पुढील बाबींची दक्षता व नोंद घ्यावी.

१. सदरची परीक्षा सुरु होण्यापूर्वी ( दि. ८ सप्टेंबर २०१८ रोजी ११.०० पर्यंत) **Keyboard आणि Mouse** परीक्षा केंद्रावर केंद्रसमन्वयक ( I T टीचर) यांचेकडे जमा करावेत.
२. परीक्षा केंद्रावर जमा केलेले **Keyboard आणि Mouse** त्या परीक्षा केंद्रावरील सर्व परीक्षार्थ्यांना वापरण्यास उपलब्ध असतील.
३. संबंधित केंद्रावरील संपूर्ण परीक्षा पूर्ण झाल्यानंतरच हे **Keyboard आणि Mouse** संस्थांना परत मिळू शकतील. म्हणजे संबंधित संस्थेस परीक्षा पूर्ण होण्यापूर्वी **Keyboard आणि Mouse** परत मिळू शकणार नाहीत.
४. संस्थांनी **Keyboard आणि Mouse** परीक्षा केंद्रांना उपलब्ध करुन देणे हे ऐच्छिक असेल. तसेच या साहित्याची हानी, तूट-फूट झाल्यास अथवा हरवल्यास त्याची कोणतीही भरपाई परीक्षा केंद्राकडून अथवा परीक्षा परिषदेकडून मिळणार नाही. याचीही संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.
५. परीक्षा केंद्रावर स्वत:चे **Keyboard आणि Mouse** टंकलेखन संस्थांनी उपलब्ध करुन देण्यास परवानगी देण्यात आली असल्याने परीक्षा केंद्रावरील **Keyboard आणि Mouse** बाबतच्या कोणत्याही तक्रारींची यापुढे दखल घेतली जाणार नाही.

**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१**

**प्रत कार्यवाहीसाठी :-**

१. शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प. सर्व.
२. शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प).
३. सर्व केंद्रसंचालक व सर्व केंद्रसमन्वयक ( I T टीचर) परीक्षा केंद्र (GCC-TBC) सप्टें २०१८.

जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१८/ 7426
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 06/09/ २०१८

प्रति,

संस्थाचालक / प्राचार्य (सर्व),
शासनमान्य संगणक टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र राज्य.

**विषय :- शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-SSD-CTC) सप्टेंबर २०१८** सध्याच्या गुणदान पध्दतीनुसार बॅकस्पेस आणि डिलीट कीज चा वापर करण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** कार्यकारी समिती सभा क्र.२६ ठराव क्र.४२१ दि. २२/१२/२०१७

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (**GCC-SSD-CTC**) मोबाईल कॉम्प्युटींग, लेटर, बॅलन्सशीट या प्रश्नांसाठी बॅकस्पेस व डिलीट या कीज चा वापर करण्याची मुभा होती परंतु स्पीड पॅसेज मध्ये मात्र बॅकस्पेस व डिलीट या कीज वापरल्यास विद्यार्थ्यांचे गुण (Marks) कमी होत असत.

परिषदेच्या कार्यकारी समिती सभा क्र. २५ ठराव क्र. ४०६ नुसार गुणदान व परीक्षा पध्दत बदल करण्याबाबतची एक समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालन्वये कार्यकारी समिती सभा क्र. २६ ठराव क्र. ४२१ नुसार स्पीड पॅसेज मध्येही बॅकस्पेस व डिलीट या कीजचा वापर करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१**

प्रत माहितीस्तव :-

१. **अशासकीय सदस्य, कार्यकरी समिती, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे (सर्व)**
२. **विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)**
३. **शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प. (सर्व) / शिक्षण निरीक्षक (उ/द/प)**
४. **सौ. वर्षा खराडे, व्यवस्थापक, विनर सॉफ्टवेअर प्राय. लिमी. पुणे. (यांना कळविण्यात येते की, वरील बदलांप्रमाणे आपल्या सॉफ्टवेअर मध्ये बदल करावा.**